असा. क्र. २४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जून १२, २००७/ज्येष्ठ २२, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश .. .. .. .. .. .. .. | २१२-२१४ |

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २००७

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2007.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.*

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई
१९५९ चा ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,
मुंबई ३. १९६२ चा १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक
महा. ५. व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;



**[किंमत : रुपये ९.००]**

भाग चार—४२

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००७ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये सुधारणा**

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १०-१क मध्ये,— १९५९ चा मुंबई ३.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

प्रकरण तीन

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये सुधारणा**

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, याच्या कलम १२क मध्ये,— १९६२ चा महा. ३.

(एक) पहिल्या परंतुकामध्ये, खंड (दोन) मधील " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " तीन महिन्यांच्या मुदतीत " या मजकुराऐवजी " चार महिन्यांच्या मुदतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

## निवेदन

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राखीव जागेवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीस नामनिर्देशनपत्र भरताना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु, सदर व्यक्तीने नामनिर्देशनपत्र भरण्यापूर्वी जातीचे प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे अर्ज करूनही पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल तर त्या व्यक्तीस, निवडून आल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करता येते.

२. महानगरपालिका व नगरपरिषदेच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र मिळविण्यास निर्माण झालेल्या अडचणींचा विचार करून शासनाने वरील तीन महिन्यांची मुदत एक महिन्याने वाढविली आहे. अशाच प्रकारे ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुकीत राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठीची मुदत एक महिन्याने वाढविण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ११ जून २००७.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**भूषण गगराणी,**
शासनाचे सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई